# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
# ग्राहक गा–हाणे निवारण मंच
# नागपुर शहर परिमंडळ, नागपुर.

---

## प्रकरण क्रं. ग्रागानिमं/नाशप/०५३ /२०१०

अर्जदार : श्री भोजराज शंकरराव बांते,
राहणार २१२, रेशीमबाग,
नागपुर.

– विरूध्द –

गैरअर्जदार : कार्यकारी अभियंता,
महाल विभाग, नाशप,
म.रा.वि.वितरण कंपनी मर्या,
नागपुर.

गणपुर्ती : 1) श्रीमती के.के घरत
सदस्य–सचिव,
ग्राहक गा–हाणे निवारण मंच
नाशप, नागपुर.

2) श्रीमती गौरी चांद्रायण,
सदस्या
ग्राहक गा–हाणे निवारण मंच,
नाशप, नागपुर.

–– आदेश ––

पारीत दि. १६.०८.२०१०

ग्राहक गा–हाणे निवारण मंचात अर्जदार यांनी तक्रार अर्ज दिनांक १७. ०७.२०१० रोजी म.राज्य विद्युत नियामक आयोग (ग्रागानिम व विद्युत लोकपाल) विनियम ६.४ विनियम २००६ प्रमाणे दाखल केलेला आहे.

अर्जदाराचा गा–हाण्याचा तपशील :–

१. श्री भोजराज शंकरराव बांते रा. रेशीमबाग, नागपुर अर्जदार यांनी, त्यांचे घरगुती वापराचे देयक न देता व्यावसायीक दराने दिल्याबाबत गैरअर्जदारास माहे एप्रिल २०१० मध्ये तक्रार केली होती. वारंवार पाठपुरावा करूनही गैरअर्जदारातर्फे योग्य प्रतिसाद न मिळाल्यामुळे दि. १७.०७.२०१० रोजी मंचात गा–हाणे दाखल केले व विनंती केली की ––

अ. अर्जदाराचा घरगुती वापर असल्यामुळे घरगुती वापराच्या दराने विद्युत देयके देण्यांत यावे.

२. अर्जदाराने मंचात दाखल केलेल्या तक्रारीत असे नमुद केले आहे की, त्यांचा ग्राहक कं. ४१००१००४३०१४७ आहे दि. ३१.०३.२०१० रोजी गैरअर्जदारातर्फे सदर विद्युत जोडणीवर थकबाकी दर्शवुन विद्युत पुरवठा खंडीत करण्याकरीता कर्मचारी पाठविण्यात आले होते. कर्मचा–याजवळ असलेल्या यादीमध्ये सदर विज जोडणीवर रू. ८,१३६/– थकबाकी दर्शविली होती. अर्जदाराने असे नमुद केले आहे की ते नियमीतपणे विद्युत देयके भरतात व फेब्रुवारी २०१० पर्यत त्यांनी पुर्ण देयके भरले होते. तेव्हा गैरअर्जदारानी सदर अवाजवी बिल कोणत्या आधारावर पाठविले याचे स्पष्टीकरण न देता विज पुरवठा खंडीत करण्याकरिता कर्मचारी पाठविले. त्यामुळे अर्जदाराच्या कुटुंबीयांना मानसिक त्रास झालेला आहे. याबाबत अर्जदाराने माहे एप्रिल मध्ये गैरअर्जदाराच्या कनिष्ठ अभियंता कार्यालयास संपुर्ण माहिती देण्याबाबत विनंती केली होती, परंतु सदर तक्रारीची कुठलीही दखल गैरअर्जदारातर्फे घेण्यात आलेली नाही. तेव्हा पुन्हा संबंधीत कार्यालयास अवाजवी देयकाबाबत विचारणा केली असता अर्जदाराला

असे कळविण्यात आले की घराचे बांधकाम सुरू आहे व ते बांधकाम व्यावसायिक कारणास्तव सुरू असल्याने विज दरात बदल करण्यात आला आहे. अशी माहिती मिळाल्यावर अर्जदाराने पुन्हा गैरअर्जदारास जुन महिन्यामध्ये तक्रार अर्ज दाखल केला व त्यानुसार गैरअर्जदारास सांगितले कि अर्जदाराच्या घराचे बांधकाम सुरू आहे व विजेचा वापर घराच्या बांधकामकरीताच होत आहे. तेव्हा कुठलीही सुचना न देता व्यावसायिक दराने विद्युत देयके देणे योग्य नाही. तेव्हा चौकशी करून घरगुती वापरांच्या दराप्रमाणे विद्युत देयके देण्यात यावे व योग्य ती दुरूस्ती मार्च 2010 पासुन देण्यात आलेल्या देयकात करण्यात यावी. परंतु गैरअर्जदारातर्फे सदर अर्जावर कुठलीही दखल घेण्यात आली नाही. तेव्हा अर्जदाराने मंचात आपला अर्ज दाखल केला आणि योग्य तो न्याय देऊन घरगुती वापर असल्यामुळे घरगुतीदराने विद्युत देयक देण्याबाबत विनंती केली.

३. दिनांक ०२.०८.२०१० रोजी मंचात गैरअर्जदाराने आपले उत्तर दाखल केले. त्यामध्ये असे नमुद केले आहे की दिनांक ११.०२.२०१० रोजी श्रीमती सरस्वतीबाई बांते यांच्या घराची पाहणी केली असता विजेचा वापर बांधकाम करण्याकरीता होत असल्याचे आढळले आणि सदर बांधकाम व्यावसायिक दृष्टीने करण्यात येत असल्याचे प्रथम दर्शनी आढल्यामुळे विद्युत कायदा २००३ कलम १२६ अनुसार कार्यवाही करण्यात आली व अर्जदारास रू. ७८९४.४८ या रकमेची अतिरिक्त आकारणी करण्यात आली आहे.

४. दिनांक ०३.०८.२०१० रोजी मंचात सुनावणी घेण्यात आली दोन्ही पक्ष उपस्थित होते. गैरअर्जदारातर्फे श्री सी.एम. खंडाळकर, का.अ. महाल विभाग, नागपुर उपस्थित होते. श्री भोजराज शंकरराव बांते, अर्जदार यांनी मंचासमोर आपली बाजु मांडतांना सांगितले की त्यांच्या घराचे बांधकाम घरगुती वापराकरीता आहे. त्यांनी आपले जुने घर पाडुन नवीन बांधकाम सुरू केले आहे. तसेच तिथे

कुठलेही दुकान, ऑफिस काहीही करायचे नसुन फक्त, त्यांच्या आई व बहीणी साठी राहायची सोय करीण्याकरीता बांधकाम सुरू आहे. तेव्हा गैरअर्जदारातर्फे करण्यात आलेला विद्युत दरातील बदल योग्य नाही.

५. गैरअर्जदाराने मंचासमोर आपले स्पष्टीकरण सादर केले की सदर ग्राहकाच्या घरी नवीन बांधकाम व्यवसायिक दृष्टीने होत आहे. त्यांनी पुरावा म्हणुन जागेचा प्लान मंचासमोर सादर केला, ज्यामध्ये गाळे दर्शविले आहेत जे व्यावसायिक कामाकरीता मंजुर केल्याचे दिसते.

६. सदर बाबतीत जेव्हा अर्जदारास मंचाने विचारणा केली तेव्हा अर्जदारानी सांगितले की जरी सदर गाळे व्यावसायिक कारणाकरीता मंजुर केले आहे, तरी त्याचा वापर घरगुती वापराकरीताच होणार आहे. तेव्हा विद्युत दरात करण्यात आलेले बदल रद्द करण्यात यावे व घरगुती दराने विद्युत देयक देण्यात यावे.

७. दोन्ही पक्षाचे म्हणणे ऐकल्यानंतर व दाखल केलेल्या कागदपत्रावरून मंचाचे असे मत आहे की अर्जदाराच्या जागेवर होणारे बांधकाम व्यावसायिक दृष्टीने मंजुर करण्यात आलेले आहे. तेव्हा हे प्रकरण अनाधिकृतरित्या विज वापरण्याकरीता विद्युत कायदा २००३ कलम १२६ मध्ये येतो. तेव्हा महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्रागानिमंच व विद्युत लोकपाल) विनिमय २००६ कलम ६.८ नुसार सदर गा—हाणे मंचाच्या अधिकाराक्षेत्रात येत नाही. परंतु सुनावणी सुरू असतांना अर्जदाराने मंचाला विनंती केली कि जरी व्यावसायिकरित्या मंजुर झालेले गाळयांच्या वापर घरगुती वापराकरीता होणार आहे, तेव्हा बांधकाम पुर्ण झाल्यावर घरगुती दराने विज आकारणी करावी. यावर गैरअर्जदाराने आपली संमती दर्शविली. तेव्हा दोन्ही पक्षकारांनी संयुक्तरित्या मंजुरीचे पत्र दाखल केले, ज्यामध्ये असे नमुद आहे की अर्जदाराने कलम १२६ अनुसार केलेल्या विज

आकारणीची रक्कम ७८९४.४८ भरावी. तसेच बांधकाम होईस्तोवर व्यावसायिक दराप्रमाणे विजेची आकारणी होईल व त्यानुसार विद्युत देयक देण्यात येतील. तसेच बांधकाम संपल्यावर अर्जदाराच्या अर्जाप्रमाणे जो वापर दर्शविला असेल त्यानुसार उचित वीज दर लावुन आकारणी करण्यात येईल.

## आदेश

1. दोन्ही पक्षाचे म्हणणे ऐकल्यानंतर व मंचात सादर केलेल्या कागदपत्रांवरून सदर गा–हाणे मंचाच्या अधिकार क्षेत्रात येत नसल्याने सदर तक्रार खारीज करण्यात येत आहे.
2. दोन्ही पक्षकारांनी संयुक्तरित्या मंजुरीपत्र मंचात सादर केले आहे. त्याप्रमाणे त्याची अंमलबजावणी करावी.

सही / –
(श्रीमती के.के. घरत)
सदस्य – सचिव

सही / –
(श्रीमती गौरी चांद्रायण)
सदस्या

सदस्य–सचिव
(कार्यकारी अभियंता)
ग्राहक गा–हाणे निवारण मंच (नाशप.)
म.रा विद्युत वितरण कंपनी मर्या. नागपूर.